संपादकीय....

# केंद्र व राज सरकारकडून कामांचे 'आऊट सोर्सिंग'

राज्य सरकार असो वा केंद्र सरकार १९९६ पासून नोकर भरती बंद आहे. राज्य व केंद्र सरकार यांचा एकूण महसुलाच्या ७० टक्के पेक्षा अधिक हा कर्मचाऱ्यांचा पगारावर खर्च होतो. केंद्र व राज्य सरकारच्या विविध विभागांमध्ये चतुर्थ श्रेणी कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणात होती . त्यामुळे सरकारने निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या जागी नवीन भरती केलीच नाही. याचा अर्थ एका बाजूला अनेक पदे रिक्त असताना दुसऱ्या बाजूला ती भरायची नाही. असलेल्या कर्मचारीवर्गांवरच अवलंबून राहायचे व त्यांच्याकडून काम करून घ्यायचे असे धोरण सरकारने अवलंबले. यासह अनेक केंद्र व राज्य सरकारच्या विभागांमध्ये ठेकेदारी पद्धतीने कर्मचारी घ्यायला सुरुवात केली. तर केंद्र सरकारने ''मल्टी टास्क वर्कर '' त्या गोंडस नावाखाली खाजगी संस्थेमार्फत कामगार भरती केली. केंद्र सरकारची नोकरी म्हणून केंद्र सरकारची नोकरी म्हणून पदवीधर व उच्चशिक्षित या मल्टी टास्किंग वर्क पदासाठी अर्ज केले. या कामगारांना कार्यालयाचे आवारातील गवत कापण्यापासून फायलिंग करण्यापर्यंत कामे दिली गेली. पडेल ते काम हे कर्मचारी करतायेत त्यामुळे एका बाजूला बेरोजगारी वाढत असताना उच्चशिक्षित केवळ सरकारी सरकारी नोकरी म्हणून ठेकेदारी पद्धतीने पडेल ते काम करत आहेत.

**स्पर्धा परीक्षा दिलेल्या उमेदवारांनी स्वीकारले पेशंट केअर चे काम**

येरवडा प्रादेशिक म्हणून रुग्णालयात स्पर्धा परीक्षा दिलेली पेशंट केअर चे काम स्वीकारले हे काम अवघे दोन-तीन महिने केल्यानंतर त्यांच्या स्पर्धा परीक्षा निकाल लागला त्यामध्ये अनेक उमेदवार उपजिल्हाधिकारी तसेच वर्ग अधिकारी झाले. त्यामुळे त्यांनी ही नोकरी सोडून दिली याचा अर्थ एका बाजूला नोकरीसाठी खूप मोठी प्रतीक्षा यादी आहे. तर दुसऱ्या बाजूला त्या नोकऱ्या मिळवण्यासाठी दहावी-बरावी उत्तीर्ण विद्यार्थी स्पर्धा परीक्षा देणाऱ्या उमेदवाराच्या आसपास देखील फिरकत नाहीत. ही वस्तुस्थिती आहे. तर कर्मचारी काम करीत नसल्याचे कारण देत सरकारन वर्ग चार कर्मचारी भरती बंद केली. हेच धोरण ठेवल्यास हळूहळू केंद्र राज्य सरकार त्यांचे सर्व काम सर्व काम एखादी संस्था नेमून करतील यात शंकाच नाही .

**येरवडा प्रिझन प्रेसच्या कर्मचाऱ्यांची संख्या आली २५ टक्क्यावर.**

उद्योग, ऊर्जा व कामगार मंत्रालयाच्या वतीने राज्यात नऊ शासकीय मुद्रणालये आहेत. यापैकी एक येरवडा कारागृह मुद्रणालय आहे. पण या मुद्रणालयात (प्रिझन प्रेस) च्या कर्मचाऱ्यांची संख्या दहा वर्षांत २५ टक्क्यावर आली आहे. त्यामुळे नियमीत प्रसिद्ध होणारे राजपत्र (गॅझेट), पोस्टल बॅलेट, राज्य सरकारची सर्व स्टेशनरी, विविध प्रकारचे अर्ज, राज्याचे अर्थसंकल्प , सरकारी विविध प्रकाशनांची छपाई होते. मुद्रणालयातील कर्मचारी संख्या कमी झाल्यामुळे ही सर्व कामे कासव गतीने होत आहेत. विधानसभा निवडणुकीची स्टेशनरी व पोस्टल बॅलेटची वेळेत छपाई होईल का अशी शंका आहे. महाराष्ट्र सरकारच्या उद्योग ऊर्जा व कामगार मंत्रालयच्या अंतर्गत असलेले येरवडा, पुणे येथील फोटोझिंको, मुंबईतील चर्नीरोड, मुंबई, नागपूर येथे दोन मोठी एक लहान अशी तीन मुद्रणालये, कोल्हापूर, वाई आणि छत्रपती संभाजीनगर अशी नऊ मुद्रणालये आहेत. यातील सर्वात मोठे मुद्रणालय म्हणून येरवडा प्रिझन प्रेसची ओळख आहे. या प्रेसमध्ये राज्य सरकारची राजपत्र (गॅझेट), राज्य सरकारची स्टेशनरी, विविध प्रकारचे अर्ज, कॅलेंडर, डायऱ्यापासून ते पोस्टल बॅलेट पर्यंतची छपाई होते. गेल्या दहा वर्षांपूर्वी येरवडा प्रिझन प्रेसमध्ये व्यवस्थापक, सहाय्यक व्यवस्थापक, प्लॅनिंग, बायडिंग, मशिन, सांख्यिकी पर्यवेक्षका पासून ते यंत्रचालक असे ५६० कर्मचारी होते. यातील सेवानिवृत्तीनंतर अनेक पदे भरलीच गेली नाही. त्यामुळे आता फक्त १४० कर्मचारी उरले आहेत. येरवडा प्रिझन प्रेसमध्ये पंचवीस टक्केच कर्मचारी शिल्लक आहेत. त्यामुळे येथील सर्व कामे कासवगतीने होत आहेत.

दहा ते बारा वर्षापूर्वी केवळ येरवडा प्रिझन प्रेसला वर्षाला दोनशे कोटी रूपयांचा कागद लागत होता. यावरून येथील कामाची कल्पना येते. पूर्वी बल्लारपूर, शिनोली, कोल्हापूर येथील पॉलिग्राफ छपाईयंत्र होते. येथील अधिकाऱ्यांनी जर्मनीला खास दौरे काढून जर्मनीची महागडी छपाईची मशनरी आणली. मात्र यावर चांगल्या दर्जाचे काम होत नसल्याचा आरोप कर्मचारीच करीत आहेत. चौकट पर्यवेक्षकांची ९० टक्के पदे रिक्त येरवडा प्रिझन प्रेसमध्ये व्यवस्थापक हेच पद रिक्त आहे. यासह सहाय्यक व्यवस्थापकाची सहा पदे, प्लॅनिंग, बायडिंग, मशिन ऑपरेटर, सांख्यिकी यासह ९० टक्के पर्यक्षकांची पदे रिक्त आहेत.

सरकारी अनेक विभागातील पदे आता खासगी संस्थांकडून ठेकेदारी पद्धतीने भरली जात आहे.त्यामुळे चतुर्थ श्रेणीतील अनेक सरकारी पदे नामशेष झाली आहेत. राज्य सरकार असो ना स्थानिक स्वराज्य संस्थेतील पदे भरली जात नाहीत. तर खासगी ठेकेदारी पद्धतीने भरलेली पदांवर कर्मचारी काम नीट करीत नाही ही वस्तुस्थिती आहे. ही परिस्थिती अशी राहिली तर बेरोजगारी वाढणार आहे. यासह अनेक चांगल्या सरकारी संस्था जे चांगले काम करतात त्या बंद पडणार आहे. त्यामुळे सरकारला आऊटसोर्सिंग करणे सोपे होईल . त्यामुळे भ्रष्टाचारावा खतपाणी मिळेल. लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी एकमेकांच्या हातात हात घालून काम करतील यात शंकाच नाही

# गब्बर, जय, विरू आणि जेल!

शोले सिनेमा हा डकैती म्हणजे दरोडेखोरांच्या विषयाला वाहिलेला सिनेमा होता. त्यामुळे पोलीस, वकील, जेल, हाणामारी, हिंसाचार या गोष्टी ओघाने आल्याच! शोलेवर बऱ्याच जणांनी, बरंच काही लिहिले, पण त्यांच्या नजरेतून सुटलेल्या गोष्टी मी इथे मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

शेवटी काय
क्यूँ देखे दुनिया को,
दूसरों की नजर से हम!
ले दे के अपने पास
एक नजर ही तो है!

असं साहिर लुधियानवीने म्हटल्याप्रमाणे एखाद्या विषयाकडे स्वतः च्या नजरेनं बघणं, वेगळ्या पद्धतीने, वेगळ्या दृष्टिकोनातून बघणं हे कधीही चांगलं. एखाद्या विषयावर त्याच त्याच पद्धतीने आणि तेच तेच लिहिण्यात काय मजा?

असो!

तर शोले सिनेमा विषयी मला जे वेगळं आणि वेगळ्या ऍन्गलने सांगायचं आहे ते हे की, यात गब्बरला न्यायालयात आणतात, आणि दिग्दर्शकीय आणि एडिटिंगचं कौशल्य हे की यात प्रत्यक्ष न्यायालय , न्यायाधीश, वकील वगैरे या पात्रांना फाटा देण्यात आला. आणि न्यायालयाच्या आवारातून चार पाच पोलीस गब्बरला बेड्या घालून आणतानाचा म्हणजे जेलमध्ये रवानगी करण्यासाठी नेताना दाखविले आहेत, आणि न्यायाधीशांचा शिक्षा सुनावतानाचा केवळ पार्श्वभूमीवर आवाज ऐकू येतो, की लूटमार, दरोडेखोरी यासाठी गब्बरला वीस वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली आहे. इथे जर न्यायालयीन कामकाजाची दृश्ये चित्रित केली असती तर सिनेमाची लांबी आणखी वाढली असती, पात्रही वाढली असती.

न्यायालयाच्या आवारातून गब्बरला पोलीस घेऊन जात असताना, मध्येच गब्बरचा ठाकूरशी सामना होतो, तेंव्हा गब्बर आणि ठाकूर मध्ये पुन्हा एकदा शाब्दिक चकमक होते.

गब्बर म्हणतो ''याद रखुंगा, तुझे याद रखुंगा''

ठाकूर तितक्याच आत्मविश्वासाने आणि ठामपणे म्हणतो ''बीस बरस जेलमें रहने के बाद सब भूल जाओगे गब्बर''

यावर गब्बरही निडरपणे म्हणतो ''दुनिया की किसी जेल की दीवार इतनी पक्की नहीं, के गब्बर को रोक सके, और जिस दिन मै भाग निकला, बहुत पछताओगे ठाकूर, बहुत पछताओगे''

. पोलिस गब्बरला घेऊन ठाकूरच्या पुढे उजव्या बाजूला जातात, फ्रेममध्ये फक्त ठाकूर राहतो आणि दुरून गब्बरचा आवाज येत राहतो ''मुझसे दुश्मनी बहुत महेंगी पडेगी ठाकूर, बहुत महेंगी पडेगी, बहुत महेंगी!''


आणि ठाकूर ज्या फ्रेममध्ये असतो ती तशीच राहते आणि गब्बरचा आवाज संपून काही क्षण सरताच डाव्या बाजूने जेलर विकास आनंद यांचा आवाज येतो (आधी फक्त आवाज येतो आणि नंतर जसजसा आवाज जवळपास येतो, जेलर फ्रेम मध्ये येतो! ) ''ठाकूर साहब मुबारक हो, आपका एक और कैदी हमारी जेल में आ रहा है''

ठाकूर म्हणतो ''आदमी खतरनाक है जेलर साहब, खयाल रखिये!''

आणि इथे हे न्यायालयाचे लोकेशनवरील दृश्य संपते.

शोले सिनेमा जिथून सुरू होतो तो याच जेलरपासून सुरु होतो, हे आपल्याला आठवत असेल. खरंतर तो जेलर वेगळा हा जेलर वेगळा असंही रमेश सिप्पी यांना करता आले असते, पण इथे पात्रांची बचतही झाली आणि सिनेमाची कंटिन्युटीही राहिली!

गब्बर, ठाकूर आणि जेलर या तिघांच्या छोट्या पण आशयपूर्ण




संवादातून सिनेमा पुढे गतीशीलरित्या सरकत जातो, हेच या सिनेमाच्या दिग्दर्शन आणि एडिटिंगचं वैशिष्ट्य म्हणावं लागेल. ज्याला खऱ्या अर्थाने फिल्म मेकिंग आणि आदर्श फिल्म एडिटिंग शिकायचं आहे त्यांच्यासाठी शोले सिनेमाची एकेक दृश्य, एकेक फ्रेम त्या दृष्टीने बघणं, अभ्यासानं महत्वाचं आहे.

या दृश्या नंतर गब्बर थेट पळून गेलेला दाखवलेला आहे. ना जेल दाखविले ना तो जेल कशाप्रकारे तोडून पळाला? हे दाखवले आहे. पुन्हा ते दाखवले असते तर सिनेमाची लांबी आणखी वाढली असती. या उलट मात्र जय आणि विरू हे जेल मध्ये कसे जातात, का जातात, सुरमा भोपालीला मध्ये घालून स्वतःच पोलिसांनी ठेवलेला इनामही मिळवतात हे मात्र तपशीलवार आणि गंमती जमती घडवत दाखविले आहे.

जेलमध्ये जय विरू गेल्या नंतर तिथल्या असरानीचा विनोदी जेलरची एन्ट्री , त्याचा विनोदी जासूस केष्टो मुखर्जी उर्फ हरिनाम न्हाई, बिरबल इत्यादी अनेक कलाकारांची मांदियाळी आपल्याला बघायला मिळते. जी कदाचित गब्बरला जेलमध्ये टाकल्या पासून ते तो जेल तोडून पळेपर्यंतच्या दृश्यात दाखवता आले नसते. कारण गब्बरचे पात्र हे क्रूर, भयावह डाकूचे होते आणि जय विरूचे पात्र मात्र स्वतः हून जोखीम घेणारे, आयुष्य मौजमस्ती करत, हासत खेळत जगणाऱ्या अवलिया व्यक्तीमत्त्वाचे दाखविले आहे, त्यामुळे त्या दोघांनाही जेलमध्ये जाणे आणि तिथून पळ काढणे हा एक मजेचा खेळ वाटत असते. त्यामुळे ते सुरमा भोपालीला सांगून स्वतःच जेलमध्ये आलेले असतात आणि आता त्यांना स्वतःच जेल तोडून पळायचेही असते. त्यात योगायोगाने त्यांना असरानीच्या रुपाने एक मूर्ख जेलर भेटतो, आणि ते त्याला सहज फसवून जेलमधून पळून जातात. पण सुरमा भोपाली कडून बक्षिसाचे दोन हजार रुपये घेऊन त्याच्या वखारीतून बाहेर पडणार तोच दारात पोलीस उभे असतात, आणि त्यांची रवानगी पुन्हा जेलमध्ये होते. तिथे मात्र ते कैद्यांच्या पांढऱ्या वेशात खडी फोडताना दाखविले आहेत. आणि अर्थात तिथली शिक्षा संपल्यावर ते शोले सिनेमाचे मुख्य ध्येय, म्हणजे ठाकूरचे गब्बरला पकडण्याच्या मिशनवर रूजू होतात.

गब्बरच्या वेळी जेल, जेलर, खडी फोडणे या दृश्यांची गरज नसल्याने ते दाखविण्यात आले नाही मात्र विरू आणि जयच्या वेळी त्यांचे खुशालचेंडू जीवन , दिलखुलास पात्रे रंगविण्यासाठी दिग्दर्शकाने खुबीने सुरमा भोपाली, जेलर, जासूस न्हाई अशी विनोदी पात्रांची सुंदर पेरणी केली. रमेश सिप्पी यांच्या दिग्दर्शनाला सलाम आणि सलीम जावेद यांच्या लेखणीलाही!

**– श्रीकांत वाघ पुणे**
**मोबाईल ९९२३३१६२११**

# 'आनंद सहल'



काही कामानिमित्त नगर रस्त्यावरून दुचाकी घेऊन निघालो होतो. वेळ सायंकाळची होती. आय. टी. कंपन्या व शासकीय कार्यालये व आजूबाजूच्या शाळा सुटल्या होत्या. रस्त्यावर प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती. प्रत्येक वाहनचालक त्रासले होते. मोठमोठ्याने हॉर्न वाजवून निषेध नोंदवत होते. प्रत्येकाला घरी जायची घाई झाली होती. अशावेळी मी मात्र शांतपणे आजूबाजूला पहात होतो. चिडचिड करून, त्रागा करून वाहतूक सुरळीत होणार नव्हतीच. एक एस. टी. बस या वाहतूक कोंडीत सापडली होती; पण या बस मधून हसण्या खिदळण्याचा मोठा आवाज येत होता. मधूनच टाळ्यांचा कडकडाट तर मधूनच मोठमोठ्याने गाणी म्हटल्याचा आवाज येत होता. जणू या बसमधील प्रवाशांना बाहेरच्या जगाचा विसर पडला होता. वाहतूक कोंडी केव्हा सुटेल आणि आपण कधी निघू याची त्यांना चिंता नव्हती. प्रवाशांनाच काय पण वाहकाला देखील चिंता नव्हती. असे कोणते प्रवासी बसमध्ये आहेत हे जरा मान वर करून पाहिले.ती बस होती शाळेची सहल घेऊन आलेली.शाळेची ही शैक्षणिक सहल म्हणजेच 'आनंद सहल' शालेय वयात प्रत्येकाने एकदा तरी अनुभवलेली.

दिवाळीच्या सुट्या संपून शाळा सुरू झाल्या की शाळेत सहलीचे वारे वाहू लागतात. शिक्षक नियोजनात गुंग होतात. सहलीचे ठिकाण, राहण्याची व्यवस्था, जेवणाची सोय या साठी पत्रव्यवहार केला जातो. शाळेत नोटीस फिरवली जाते. सहलीचे शुल्क भरण्याची शेवटची तारीख सांगितली जाते. मुले घरी आल्याआल्या ही खुशखबर पालकांना देतात. आजकाल पालक देखील त्वरित प्रतिसाद देतात. ताबडतोब फीचे पैसे गुगल पे केले जातात. पूर्वी महिनाभर पालकांपाशी भुणभुण लावून सहलीची परवानगी घ्यावी लागायची. मुलांची नावे निश्चित होतात. सहलीसाठी नियमावली शिक्षक तयार करतात. आदल्या दिवशी सभा घेऊन योग्य सूचना दिल्या जातात. मुले घरी आल्यावर सहलीसाठी बॅग भरायला घेतात. आई बाबा मुलांसाठी चॉकलेट, चिप्स असे मुलांच्या आवडीचे पदार्थ देतातच; पण एक वेळेचा डबा देखील देतात. विविध पदार्थांची रेलचेल असते.पूर्वी सहलीचा डबा म्हणजे पिवळी बटाट्याची भाजी व चपात्या व दाण्याची चटणी किंवा पिठलं असे ठराविकच पदार्थ सहलीचे पदार्थ म्हणून मान मिळवून घेत होते. आता मात्र पास्ता, नूडल्स, केक, पेस्ट्री अशा पदार्थांनी तो मान हिसकावून घेतलेला दिसतो. मुलांची तयारी रात्रीपर्यंत सुरूच असते. आई म्हणते अरे लवकर झोप म्हणजे सकाळी लवकर जग येईल; पण या आनंद सहलीचे स्वप्न रंगविण्यात लवकर झोप लागत नाही. मात्र रोज सकाळी हलवून हलवून उठवायला लागणारी मुले या सहलीच्या दिवशी पहाटेच उठतात. सर्व आवरून लवकरात लवकर शाळा गाठली जाते.जवळजवळ अंधारातच ही चिमुकली आईबाबांना घेऊन उपस्थित झालेली असतात. पहाटे पक्षांच्या किलबिलाटाआधी या चिमुकल्यांच्या किलबिलाटाने आसमंत दुमदुमून निघतो.

बस येते शिक्षक मुलांना ओळीत बसमध्ये बसवून देतात. उत्सहाला उधाण आलेले असते. गणपती बाप्पा मोरयाचा गजर होतो. शाळेचा जयजयकार होतो, ड्रायव्हर काका जिंदाबादच्या घोषणेने बस आनंद सहलीला निघते. आईबाबांच्या बरोबर अनेक ठिकाणी ही मुले गेलेली असतात; पण आपल्या सहध्यायांबरोबर व शिक्षकांबरोबरच निघालेली ही बालके पुढच्या काळात लागणारे अनुभव घेण्यासाठी या सहलीला निघालेली असतात.शिक्षकांसाठी असलेली ही शैक्षणिक सहल मात्र बालकांसाठी आनंद सहल बनलेली असते. आनंदी वातावरणात घेतलेले शिक्षण चिरकाल टिकते असे शिक्षणतज्ज्ञ म्हणतात आणि म्हणूनच सहलीत मिळालेले शिक्षण बालकांना संघभावना, शिस्तप्रियता,सहकार्याची वृत्ती, स्वावलंबन, नेतृत्व, सामाजिक जाणिवांचे संवर्धन असे वर्गाच्या चार भिंतीत मिळणार नाही असे शिक्षण मिळवून देते. ही सहल होवून गेल्यावर देखील तिचा अंमल पुढे अनेक दिवस बालकांच्या मनावर असतो.

**– श्री. सुदाम कृष्णाजी विश्वे,**
**( निवृत्त कलाशिक्षक )**
**फ्लॅट नं.२०५,सॉलिटीअर होम्स, विठ्ठल नगर जवळ,पाषाण, पुणे – ४११०२१. मोबाईल नंबर – ९८६०५८६१४७.**

# गडकिल्ले स्मारकांच्या संवर्धनासाठी राज्य पुरातत्व विभागाला मिळणार दरवर्षी १०० ते हजार कोटी रूपये

राज्याच्या अर्थसंकल्पात राज्य पुरातत्व विभागासाठी असणारी अल्प तरतूद यामुळे विभागाकडे निधीची कमतरता व पुरेसे मनुष्यबळच हाती नसल्याने सरकारच्या पुरातत्त्व विभागाला राज्यातील गडकिल्ल्यांची दुरूस्ती व संवर्धन करता येत नव्हते. हे गडकिल्ले खरंतर महाराष्ट्राचा ऐतिहासिक ठेवाच असून, सरकारकडून त्याचे योग्य संवर्धन होत नसल्याने इतिहासाचा हा अमूल्य ठेवाच नष्ट होण्याची भिती निर्माण झाली होती. मात्र, राज्याच्या सांस्कृतिक मंत्रालयाने प्रत्येक जिल्हा नियोजन विकास समिती( डिपीडिसी) तीन टक्के निधी स्थानिक गडकिल्ले, स्मारक आणि पुरातत्व मंदिरांचे जतन व संवर्धन यासह पर्यटक व भाविकांसाठी सोई-सुविधा , सुशोभिकरणावर खर्च करण्याची मागणी केली होती. त्याप्रमाणे पुढील तीन वर्ष हा निधी मिळणार असुन राज्यातील गजकिल्ल्यांचा कायापालट होणार आहे.

पुणे शहरातील महात्मा फुले यांचा फुलेवाडा , सिंहगडावरील तानाजी मालुसरे यांचे समाधिस्थळ, छत्रपती राजाराम महाराज समाधी स्थळ, धर्मवीर संभाजी महाराजांचे वढू बुद्रुक व तुळापुर येथील स्मारक, मस्तानी कबर, मस्तानी तलाव, विश्रामबाग वाडा, चाकण किल्ला, कुकडेश्वर मंदिर , राजगड, तोरणा आणि रायगडासह राज्यातील ३५० किल्ले , तुळजापुर भवानी माता मंदिराचा कायापालट पुढील तीन वर्षांत होणार आहे. एक, दोन नव्हे तर प्रत्येक जिल्ह्याला नियोजन विकास समितीमधुन ३०० ते ३५० कोटी रूपये मिळणार आहेत. त्यामुळे गडकिल्लेयांचे संवर्धनासह तेथील इतर सोई सुविधा, सुशोभिकरणासाठी हा निधी वापरला जाणार आहे.

**भारतीय पुरातत्व सर्वेक्षणकडे २८८ स्मारके**

**कातळात खोदलेल्या जागतिक वारसा म्हणून सुप्रसिद्ध अशा अजिंठा -वेरूळ यांच्या सारख्या लेण्या, छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात उभे राहिलेले राजगड व सिंधुदूर्ग किल्ले, यादव व मराठा काळात दर्गे व मकबरे तसेच वसाहत कालीन स्थापत्यांचा समावेश आहे. ऐतिहासिक व पुरातन स्मारकांपैकी केंद्र सरकारव्दारे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मार्फत २८८ स्मारके राष्ट्रीय महत्त्वाची म्हणून जतन केली आहेत.**

**राज्यातील ३८६ स्मारके संरक्षित**

**राज्याच्या सांस्कृतिक कार्य विभागाने पुरातत्व व वस्तुसं-ग्रहालये संचालनालय मार्फत ३८६ स्मारके संरक्षित म्हणून घोषित केलेली आहेत. यामध्ये धाराशीव लेणी, राजगड, सिंहगड, माणिकगड किल्ले गडजेजुरी, निरानृसिंहपूर, श्री तुळजाभवानी मंदिर, लोकमान्य टिळक, स्वातंत्रवीर सावरकर आदी महापुरूषाची जन्मस्थळे, गेट वे ऑफ इंडिया अशा स्मारकांचे समावेश आहे.**

> **"जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत राज्या-तील गड किल्ले, मंदिर व महत्वाची संरक्षित स्मारके इत्यादींच्या संवर्धनासाठी तीन टक्के निधीचा विनियोग करण्यात येणार आहे. यामध्ये गड किल्ल्यांचे जतन व संवर्धन , देखभाल व दुरूस्ती, पर्यटक व भाविकांसाठी सोई सुविधा, सुशोभिकरण करण्यात येणार आहे.**
> **– विलास वहाणे, उपसंचालक, पुणे, राज्य पुरातत्व विभाग**

**'दैनिक महा मेट्रो', मालक, प्रकाशक, संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे, यांनी श्री समर्थ प्रिंटर्स, शॉप नंबर १, बेसमेंट वर्तक अपार्टमेंट, ४९९, शनिवार पेठ, पुणे- ४११०३० येथे छापून फ्लॅट नंबर ९, फ्रेंन्ड्स पॅराडाईज, शिरोळे रोड, शिवाजीनगर, पुणे ४११००४ येथे प्रकाशित केले.**
**वृत्तपत्रात छापलेल्या बातम्या, लेख, छायाचित्रे व जाहिराती यांच्याशी संपादक सहमत असेल असे नाही. कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.**
**मालक, प्रकाशक आणि संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे – ९९२२९३०१९५, कार्यालय संपर्क क्रमांक : ९९७०६८८८६५ ( पी.आर.बी. कायद्याअंतर्गत बातम्याच्या निवडीसाठी जबाबदार.)** Email : Mahametronews.pune1gmail.com

This 'Daily Maha Metro', Owner, Publisher by Dilip Kisan Kurhade printed at Shree Samarth Printers, Shop No. 1, Basement Vartak partment, 499, Shaniwar Peth, Pune 411030, Published from Flat No. 9, Friends Paradise Society, Shirole Road, Shivajinagar, Pune-411004.The editor does not necessarily agree with the news, articles, photographs and advertisements printed in the newspaper. Legal matters will be resolved under Pune Courts. Owner, Publisher Editor Dilip Kisan Kurhade Contact No. - 9922930195, Office Contact No. - 9970688865 (Responsible for selection of news under PRB ct.) Email. - Mahametronews.pune@1gmail.com